# महाराष्ट पोलीस भरती (जळगांव) २०१७

क्र.पोअ/जळगांव/आस्था-१/पोभ/सुचना/१६८/२०१७
पोलीस अधिक्षक यांचे कार्यालय ,
जळगांव, दिनांक-०६/०४/२०१७

**विषय-** **लेखी परिक्षेकरिता १:१५ प्रमाणे पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्दी**
**लेखी चाचणीबाबत उमेदवारांना सुचना.**

मैदानी चाचणीत किमान ५० टक्के गुण मिळालेल्या उमेदवारांची गुणानुक्रमे जाहिरातीत प्रसिध्द केलेल्या प्रवर्गनिहाय पद संख्येच्या १:१५ या प्रमाणात कागदपत्र पडताळणीच्या अधिन राहुन लेखी परिक्षेसाठी पात्र उमेदवारांची यादी दि.०६/०४/२०१७ रोजी **www.jalgaonpolice.gov.in** **तसेच** **www.mahapolice.gov.in तसेच mahapolice.mahaonline.gov.in** या संकेत स्थळावर तसेच शहर वाहतुक शाखा जळगाव येथे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यांत आली आहे.

## लेखी चाचणीसाठी पात्र ठरणा-या उमेदवारांना सुचना

१. मा. अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.रा., मुंबई यांचेकडील पत्र क्र. अपोमसं/पोशि-भरती/सन २०१७/१३३३, दि.३०/०३/२०१७ नुसार पोलीस शिपाई पदासाठी उमेदवारांची १०० गुणांची लेखी चाचणी दि. ०९/०४/२०१७ रविवारी सकाळी ०५.०० वाजता पोलीस कवायत मैदान ,जळगाव येथे घेण्यात येईल.

२. लेखी चाचणी मराठी भाषेत घेण्यात येईल. लेखी चाचणीकरीता बहुपर्यायी स्वरुपाचे (Objective Type) १०० प्रश्न असतील व लेखी चाचणीचा कालावधी ९० मिनीटांचा असेल.

३. लेखी चाचणीमध्ये (१)अंकगणित,(२)सामान्यज्ञान व चालु घडामोडी,(३)बुध्दीमत्ता चाचणी व (४)मराठी व्याकरण या विषयांचा समावेश असेल.

४. लेखी चाचणीस पात्र पुरुष/महिला उमेदवारांनी या कार्यालयाकडुन देण्यात आलेल्या ओळखपत्रासह लेखी चाचणीस नमूद ठिकाणी सकाळी ०५.०० वाजता न चुकता उपस्थित रहावे.येतांना ओळख पटाविण्याचा पुरावा म्हणुन आपले फोटो असलेले ओळख पत्र (उदा. पॅन कार्ड, आधारकार्ड, निवडणुक ओळखपत्र, वाहन परवाना, महाविद्यालयाचे ओळख पत्र इत्यादी.) सोबत आणावे.

५. उमेदवार लेखी चाचणीस विलंबाने आल्यास किंवा उमेदवाराकडे ओळखपत्र नसल्यास त्याला लेखी चाचणीसाठी प्रवेश देण्यात येणार नाही.

६. लेखी चाचणीसाठी उमेदवाराने मोबाईल/टॅब,पुस्तके, वहया, कॅलक्युलेटर, बॅग किंवा इतर कोणतेही साहित्य बरोबर घेऊन येऊ नये. उमेदवारास लेखी परिक्षेच्या वेळी कोणत्याही प्रकारच्या वस्तु बरोबर बाळगता येणार नाहीत. उमेदवाराकडे सदर वस्तु/साहित्य आढळलयास लेखी परिक्षेस अपात्र ठरविण्यात येईल. उमेदवारांनी सदर वस्तु परिक्षा मैदानाच्या बाहेर त्यांच्या जबाबदारीवर ठेवाव्यात. सदर वस्तु गहाळ झाल्यास अगर चोरी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.

७. लेखी चाचणीसाठी उमेदवारास पॅड व पेन या कार्यालयामार्फत पुरविण्यात येईल. लेखी चाचणीसाठी OMR SHEET उत्तरपत्रिका पुरविण्यात येईल.

८. लेखी चाचणीसाठी दिलेल्या उत्तरपत्रिकेवर व प्रश्न पत्रिकेवर दिलेल्या सुचनांचे उमेदवाराने अत्यंत काळजीपुर्वक वाचन करुन, त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

९. उमेदवाराने उत्तरपत्रिकेवर लिहिण्यासाठी या कार्यालयाने पुरविलेल्या काळया शाईच्या बॉलपेनचाच वापर करावा.

१०. उमेदवाराने OMR SHEET उत्तरपत्रिकेवर आपला चेस्ट नंबर, प्रश्नपत्रिका संच संकेतांक (A,B,C,Dयापैकी) अचुक नमुद करुन तो बरोबर असल्याची खात्री करावी.

११. उमेदवाराने प्रश्नपत्रिकेवर प्रश्नाचे उत्तर लिहु नये किंवा प्रश्नाच्या उत्तराचे पर्यायावर कोणत्याही प्रकारे खुण करुन त्याचे उत्तर दर्शवू नये.

१२. उत्तरपत्रिकेची तपासणी संगणक प्रणालीव्दारे करण्यात येणार असल्याने, उमेदवाराने उत्तरपत्रिकेवर कच्चे काम किंवा खाडाखोड करु नये. उत्तरपत्रिकेवर व्हाईटइंकचा वापर करु नये. उत्तराचा पर्याय रंगवतांना उत्तर पत्रिका फाटणार नाही, मातीने किंवा घामाने त्यावर डाग पडणार नाही, तसेच उत्तरपत्रिका चुरगळणार नाही. याची उमेदवाराने विशेष काळजी घ्यावी. उत्तरपत्रिका खराब झाल्यास किंवा फाटल्यास बदलुन देण्यात येणार नाही. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१३. उत्तरपत्रिकेत प्रत्येक प्रश्नक्रमांकासमोर A B C D असे उत्तराचे पर्यायाचे गोल (Circle) दिलेले आहेत. त्यातील जो पर्यय योग्य वाटेल त्या पर्यायाचा गोल काळया शाईच्या बॉलपेनने उमेदवाराने पुर्ण गडद/दाट रंगवावा.

१४. उत्तराच्या पर्यायाचा गोल अर्धवट भरल्यास अथवा अपुर्ण खुण केल्यास त्या उत्तरासाठी गुण देण्यात येणार नाहीत.

१५. एका प्रश्नाच्या उत्तराच्या पर्यायामधील एका पेक्षा अधिक गोल काळे केल्यास अथवा एकदा पर्यायाचा गोल काळा केल्यावर सदरचे उमेदवारास उत्तर चूकीचे वाटल्याने त्यावर खाडाखोड करुन दुस-या पर्यायाचा गोल काळा केल्यास , सदर संपूर्ण उत्तर चुकीचे धरण्यांत येईल व अशा बरोबर असलेल्या उत्तरासाठी गुण देण्यांत येणार नाहीत.

१६. उत्तरे भरण्यांसाठी उमेदवारांनी खालील पध्दतीचा वापर करावा.

**योग्य पध्दत**



A B C D

**चुकीची पध्दत**



A B C D

१७. परिक्षा सुरु असतांना उमेदवारास उत्तरपत्रिका किंवा प्रश्नपत्रिका परीक्षा कक्षाच्या/मैदानाबाहेर घेवुन जाता येणार नाही.

१८. उत्तरत्रिका CARBONLESS OMR SHEET असल्याने उमेदवारास परिक्षा संपल्यानंतर उत्तरपत्रिकेची कार्बन प्रत देण्यात येईल.

१९. परीक्षेचा कालावधी संपल्याची अंतिम सुचना झाल्यावर उमेदवाराने उत्तरे लिहिणे थांबवुन, उत्तरपत्रिकेवर नमुद केलेला चेस्ट नंबर, पश्नपत्रिका संच संकेतांक (A,B,C,D यापैकी)बरोबर असल्याची तसेच उत्तरपत्रिकेवर स्वतःची व पर्यवेक्षक अधिकाऱ्यांची स्वाक्षरी असल्याची पुन्हा खात्री करावी.

२०. सर्व उत्तरपत्रिका गोळा होऊन हिशोब होईपर्यंत व उत्तरपत्रिकेची कार्बन प्रत मिळेपर्यंत उमेदवाराने आपल्या जागेवर बसुन रहावे.

२१. लेखी परीक्षा झाल्यावर १ तासात परिक्षेची नमुना उत्तरपत्रिका (**Model Answer Sheet**) प्रश्नपत्रिकेच्या संकेतांकानुसार जळगांव पोलीस दलाच्या **www.jalgaonpolice.gov.in** तसेच **www.mahapolice.gov.in** **तसेच mahapolice.mahaonline.gov.in** या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

२२. उमेदवारांचे उत्तरपत्रिकेची तपासणी संगणक प्रणालीव्दारे करुन, नमूना तपासणी (Random Sampling)पुर्ण झाल्यावर उमेदवारांना लेखी परीक्षेत मिळालेले गुण जळगांव पोलीस दलाच्या **www.jalgaonpolice.gov.in** **तसेच www.mahapolice.gov.in तसेच mahapolice.mahaonline.gov.in** या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच शहर वाहतुक शाखा जळगाव जवळ चिकटविण्यात येतील.

२३. उमेदवारास लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणांबाबत तक्रार असल्यास व उत्तरपत्रिकेची फेरतपासणी करावयाची असल्यास लेखी परीक्षेचे गुण प्रसिध्द केल्यानंतर ४८ तासांच्या आत लेखी निवेदन सादर करणे आवश्यक आहे. उत्तरपत्रिकेच्या फेरतपासणीसाठी उमेदवारास रु.२००/- (अक्षरी रु. दोनशे मात्र) इतके अतिरिक्त शुल्क भरावे लागेल. याबाबत पोलीस भरती निवड मंडळाचा निर्णय अंतिम राहिल.

२४. कोणत्याही टप्प्यात उमेदवारांकडुन कागदपत्रांच्या व भरती निकषांच्या कोणत्याही अटी व शर्थींचे उल्लंघन झाल्यास अथवा पूर्तता न झाल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यांत येईल.

२५. लेखी परीक्षा अत्यंत पारदर्शक व तटस्थ पध्दतीने घेतली जाणार असून उमेदवाराने गैरपध्दतीचा वापर करु नये. कोणीही तसा प्रयत्न करतांना आढळून आल्यास त्याच्याविरुध्द कायदेशिर कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी.

२६. जळगांव जिल्हा पोलीस शिपाई भरती २०१७ संदर्भात पोलीस भरती निवड मंडळाचा निर्णय अंतिम राहिल.

(एम.बी.पाटील)
**पोलीस उप अधीक्षक, मुख्यालय**
**पोलीस अधीक्षक जळगांव करिता.**